पाठवणार - विहंग मित्र,
११२०/४ मॉडेल कॉलनी,
शिवाजीनगर, पुणे १६.

दि. ५ जुलै १९८७ रोजी म्युझियम ऑफ आरथ्रोपोडा मध्ये [संधिपाद प्राणी संग्रहालय] श्री विजय आंबेडकर, अध्यक्ष [७वे पक्षी मित्र संमेलन] यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील फ्रेंडस ऑफ ट्रीझ, डबल्यू. डबल्यू. एफ, आरोग्य दक्षता मंडळ, मराठी विज्ञान परिषद, एकॉलॉजिकल सोसायटी, निसर्ग सेवक, विहंग मित्र, संधिपाद संग्रहालय, फ्रेंडस ऑफ ॲनिमल्स या संस्थांचे प्रतिनीधी उपस्थित होते. ,हया सर्व संस्थांनी डॉ. सलीम अलींना श्रध्दांजली वाहिली. याच वेळी श्री. प्रकाश गोळे, डॉ. भरुचा, डॉ. एस. व्ही. भावे, डॉ. रमेश बिडवे, डॉ. वर्तक यांनी व अध्यक्ष श्री. आंबेडकर यांनी त्यांच्या विषयीच्या आठवणी सांगितल्या. याच वेळी डॉ. सलीम अली यांचे पुण्याच्या परिसरात उचित स्मारक होण्यासाठी खालील ठराव करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाने व पुणे महानगरपालिकेने खालील ठरावाची त्वरीत अंमलबजावणी अग्रक्रमाने करावी अशी सर्व निसर्ग प्रेमींची इच्छा आहे.

ठराव क्रमांक - १ - ठराव मांडणार - श्री. प्रकाश गोळे.
पुण्यात डॉ. सलीम अलींचे ऊचित असे स्मारक होणे आवश्यक आहे यासाठी येरवडा येथील नियोजित पक्षी अभयरण्यास त्यांचे नाव देण्यात यावे. हा प्रदेश प्रत्यक्षात येण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व तरतुदी शासनाने अग्रक्रमाने पुर्ण कराव्या.

ठराव संमति देणार - श्री. विश्वास राणे.

ठराव क्रमांक - २ - ठराव मांडणार - डॉ. रमेश बिडवे.
पुणे महानगरपालिकेने पाषाण येथे जलपक्षी अभयारण्य करण्याचे ठरविले आहे. त्या दृष्टीने काही कामेही सुरू झाली आहेत. या अभय प्रदेशाचा व मुळामुठा अभयारण्याचा [नियोजित डॉ. सलीम अली अभयारण्य] पक्षी स्थलांतराच्या दृष्टीने अगदी निकटचा संबंध आहे. हे लक्षात घेता पुणे महानगरपालिकेने पाषाण येथील अभयारण्याला श्रीमती तहमालिया सलीम अली जलपक्षी अभयारण्य असे नांव देऊन हया दोघांचाही ऊचित असा सन्मान करावा.

ठराव संमति देणार - डॉ. अरविंद पटवर्धन.

ठराव क्रमांक - ३ - ठराव मांडणार - डॉ. एस्. व्ही. भावे

It is resolved that the present lovers of Dr. Salim Ali gathered today would established a bird & nature station at Bhigwan named as Dr. Salim Ali Hut.

The first trip should take place on ninteenth July (19th July) when we would officially list the birds, their count & water analesis as on that day.

ठराव संमति देणार - डॉ. एरिच भरुचा.

| | उपस्थित असलेल्यांची नावे | संस्था |
|---|---|---|
| १] | व्ही. सी. आंबेडकर | बी. एन. एच. एस. |
| २] | व्ही. डी. वर्तक | मराठी विज्ञान परिषद |
| ३] | सौ. सुधा पुरोहित | नेचर लव्हर |
| ४] | कु. कविता महाजन | विहंग मित्र. |
| ५] | कु. प्रतिभा पुराणिक | विहंग मित्र. |
| ६] | कु. सुशीला दप्तरदार | विहंग मित्र. |
| ७] | श्री. प्रकाश गोळे | एकॉलॉजिकल सोसायटी |
| ८] | स्वाती गोळे | एकॉलॉजिकल सोसायटी |
| ९] | ए. आर. पटवर्धन | आरोग्य दक्षता मंडळ |
| १०] | सौ. स्टीरा वाडिया | डब्ल्यु. डब्ल्यु. एफ. |
| ११] | नसरीन वकील | डब्ल्यु. डब्ल्यु. एफ. |
| १२] | कपिला भरुचा | डब्ल्यु. डब्ल्यु. एफ. |
| १३] | डॉ. रमेश बिडवे | विहंग मित्र |
| १४] | डॉ. एरिच भरुचा | बी. एन. एच. एस. |
| १५] | प्रा. संजीव नलावडे | विहंग मित्र |
| १६] | शशी पटवर्धन | निसर्ग सेवक |
| १७] | तुषार फडणीस, किरण पुरंदरे | डब्ल्यु. डब्ल्यु. एफ |
| | डॉ. रमेश गोडबोले | निसर्ग सेवक |
| | मेधा कोठाडिया | |
| | श्री. केतकर | संधिपाद संग्रहालय |







**BOOK POST**

To, Mr, Prakash. Gole.
8 B. Abhimanshree.
Society
N.C.L Road Pune ~~7~~.
8

विहंग मित्र
(पक्षी निरीक्षण मंडळ)
~~H2~~ 1120/4 Model colony
Pune. 16.